# सापळा केस

दिनांक २४/०७/२०२१

**1. राजेद्र रामकरण पाल वय ५५ वर्षे व्यवसाय उपविभागीय पोलीस अधिकारी सेलु. (वर्ग १) २. गणेश लक्ष्मणराव चव्हाण वय ३७ वर्षे व्यवसाय पोलीस नाईक ब.न ११२१ (वर्ग ३) यांनी १०,००,०००/— रू लाच स्विकारलेची यशस्वी सापळा कारवाई.**

यातील तक्रारदार यांनी मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयात समक्ष हजर राहुन येथे दि. २२/०७/२०२१ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांचा मित्राचा अपघाती मृत्यु झाले बाबत दि.०३/०५/२०२१ रोजी सेलु पोलीस ठाणे जि. परभणी येथे गुन्हा रजि क्रमांक १२०/२०२१ भादवि. कलम ३०४(अ),२९७,४२७ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. सदरी गुन्हयातील मयत याचे पत्नी सोबत यातील तक्रारदार यांचे झालेले संभाषण व्हायरल झाल्याने दि. ०९/०७/२०२१ रोजी यातील आरोपीत क्र.१ यांनी तक्रारदार यांना त्यांचे कार्यालयात बोलावुन ' तुझी व्हायरल झालेली क्लीप मी ऐकली असुन यातुन तुला बाहेर पडायचे असेल तर मला २ कोटी रूपये दयावे लागतील' असे बोलुन तक्रारदार यांना वारंवार फोन करून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून २ कोटी रूपये लाचेची मागणी केली. तक्रारदारास आरोपी लोकसेवकास लाच दयावयाची नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे दि. २२/०७/२०२१ रोजी प्रत्याक्ष येवुन लेखी तक्रार दिली मा.वरीष्ठाचे आदेशाने सदर तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी लाचलुचतप प्रतिबंधक, मुंबई यांना निर्देश देण्यात आले.

त्यानुसार दि.२३/०७/२०२१ रोजी तक्रारदार यांच्या तक्रारीवरून पडताळणी केली असता यातील आरोपी क्र.१ याने तक्रारदार यांचेकडे वर नमुद गुन्हयात मदत करण्यासाठी २ कोटी रूपयाची मागणी करून तडजोडीअंती १ कोटी ५० लाख रूपये इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केल्यावरून करण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीत आरोपी क्र.२ यास तक्रारदार यांचे भावाकडुन १०,००,०००/— रूपये (दहा लाख रूपये ) लाचेची रक्कम स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचे पथकाने रंगेहात पकडण्यात आले त्यावरून पोस्टे सेलु येथे गुन्हा दाखल करून पुढील तपासकामी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडे देण्यात आला आहे. सदर आरोपीतांची सेलु येथील घराची घरझडती घेण्यात आली असून आलोसे क्र.१ याचे मुंबई येथील घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया चालु आहे.

सदरची कार्यवाही मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मा.अपर पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मा.अपर पोलीस आयुक्त,. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई, मा.पोलीस अधिक्षक श्रीमती.कल्पना बारवकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली आबासाहेब पाटील,सहायक पोलीस आयुक्त, पोलीस उप अधिक्षक श्री.भरत केशवराव हुंबे, प्रविण पांडुरंग बनगोसावी, पोनि,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई, पोनि श्री. राजेश पुरी, व सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकांविरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचाराविरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाच लुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.


**दुरध्वनी क्रमांक ०२४५२—२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक,ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड — ८८८८८४१९६५

श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड — ९६६५४७९३३३

श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी — ७०२१००२११०


Scanned with CamScanner